# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ८

सभावृत्तांत

दिनांक १८/०९/२०१५ दुपारी १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे सप्टेंबर २०१५ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०१८/०९/२०१५ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. अरुण मदन टाक | सभापती |
| २. | मा. श्रीमती सुनिता राजेश वाघेरे | सदस्या |
| ३. | मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्या |
| ४. | मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ५. | मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे | सदस्य |
| ६. | मा. श्री. बोकड रामदास गेणभाऊ | सदस्य |
| ७. | मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |

खालील प्रमाणे नामनिर्देशित सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री. पाडुळे शिवाजी तुकाराम

२. मा. श्री. सागर खंडू कोकणे

३. मा. श्रीमोहिते धनंजय गणपत .

----------

याशिवाय, मा. चंद्रकांत खोसे, क्षेत्रिय अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. डॉ. सतीश गोरे, पशु वैद्यकीय अधिकारी, मा. आव्हाळे एस. टी. लेखाधिकारी, मा. नितीन देशमुख, उपअभियंता विद्युत, मा. व्ही. के. बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. रत्नपारखी, मा. विनय ओहोळ, मा. एल.बी. जाधव, उपअभियंता स्थापत्य, मा. राजेंद्र जावळे, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा,मा. अनघा पाठक, उपअभियंता, झो.नि,पू., मा. अजय जाधव, मा.एस.एस. गायकवाड,मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. विश्वास गेंगजे. क्रीडा अधिकारी, मा. मा.बी.एम. मुलाणी, मा. ए.के. इदे, मा. जयवंत बी. रोकडे, कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. निलेश दाते. कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. पाडवी कनिष्ठ अभियंता, विद्युत, मा. डी. के. बैचे, हॉर्टी. सुपरवायझर, मा. जी.आर. गोसावी, सहा. उद्यान अधिक्षक, मा.सोनवणे ए.सी., मा. चौहान एस.एच., मा. पाटील एस.ए., मा. सौदाई, आरोग्य निरीक्षक, मा.चौधरी, सर्व्हेअर, नगररचना मा. एच. पी. सुभेदार, अतिक्रमण निरीक्षक, मा. अमर मद्रासी मलेरिया इन्सपेक्टर, इ. अधिकारी उपस्थित होते.

**मा. सचिव, सभा शाखा** :- मागील सभा कार्यपत्रिका क्र. ६ दिनांक ०७/०८/२०१५ व कार्यपत्रिका क्र. ७ दिनांक २१/८/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणे

**मा. सभापती** : मागील सभा कार्यपत्रिका क्र. ६ दिनांक ०७/०८/२०१५ व कार्यपत्रिका क्र. ७ दिनांक २१/८/२०१५ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता मिळावी.

सन्मा. सदस्य व मा. सभापती यांचे मान्यतेने बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. १**:- ड क्षेत्रिय कार्यालयाचे पाणीपुरवठा विभागाकडील शिकाऊ प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन बिले अदा करणेकामी "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षामधुन "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर र.रु. २,००,०००/- तरतुद वर्ग करणेबाबत

**विषय क्र. २** :- पिंपरी येथील मिलिंदनगर प्रभाग क्र. ४३ पुनर्वसन प्रकल्प टप्पा क्र. १ येथील २४ इमारती या ठिकाणी काळेवाडी पुलाकडून त्रिलोक्य स्मशानभूमीपासुन मिलिंदनगर पुनर्वसन टप्पा क्र. १ या ठिकाणी तीन रस्ते एकत्र येणा-या चौकास "राजे सम्राट अशोक चौक" असे नामकरण करण्यात यावे तसेच सदर ठिकाणी महापालिकेच्या वतीने "राजे सम्राट अशोक चौक" म्हणुन नामफलक लावणेबाबत

**विषय क्र.** ३ : ड क्षेत्रिय कार्यालयाचे विद्युत विभागाकडील "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावरुन र.रु. २,००,०००/- इतकी तरतुद "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर वर्ग करणेबाबत

**विषय क्र.** ४ : ड क्षेत्रिय कार्यालयाचे विद्युत विभागाचे महसुली कामातील "किरकोळ देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षाअंतर्गत अंदाजपत्रकातील ड प्रभाग इमारतीच्या उद्वाहकाची देखभाल व दुरुस्ती या कामासाठी सन २०१५-१६ साठी केलेली तरतुद कमी पडत असल्याने ड प्रभाग वाकड उपविभागातील शाळा इमारतींमध्ये विद्युत विषयक देखभाल व दुरुस्ती करणे या कामातुन र.रु. ५०,०००/- व ड प्रभाग कार्यालयातील दूरध्वनी यंत्रणेची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे या कामातुन र.रु. १,००,०००/- अशी एकुण र.रु. १,५०,०००/- तरतुद "किरकोळ देखभाल दुरुस्ती" याच लेखाशिर्षांतर्गत "ड प्रभाग इमारतीच्या उद्वाहकाची देखभाल व दुरुस्ती" या कामासाठी वर्ग करणे

**विषय क्र. ५** :- प्रभाग क्र. ५४ विशालनगर पिंपळे निलख येथील स.नं. २० नंदनवन सोसायटीकडे जाणा-या रस्त्यास "कै. संकेत रामचंद्र इंगवले पथ" असे नामकरण करणे व स.नं. २८ बालवडकर , बैकर, गायकवाड व ससार यांच्या घराकडे जाणा-या रस्त्यास "जय मल्हार कॉलनी" असे नामकरण करणे बाबत

**विषय क्र. ६** : प्रभाग क्र. ५६ मध्ये सर्व्हे नं. ७९ मध्ये आरक्षण क्र. ३५५ या ठिकाणी चिल्ड्रेन पार्क विकसित होत असुन सदर उद्यानास "श्रीमती शेवंताबाई खंडूजी जगताप मुलांचे उद्यान" असे नामकरण करणे

सन्मा. नगरसदस्यांच्या मागणीनुसार व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने दिनांक १८/०९ /२०१५ रोजीच्या सभेमध्ये ऐन वेळी दाखल केलेले विषयांवर खालील प्रमाणे मंजुरी देणेत आली.

ठराव क्र. २० विषय क्र. १
दिनांक : १८ /०९/२०१५ विभाग : पाणीपुरवठा विभाग
संदर्भ : मा. क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. डक्षे/पापु/१/कावि/१००१/२०१५ दिनांक ०३/०९/२०१५

ड क्षेत्रिय कार्यालयाचे पाणी पुरवठा विभागाचे "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ या आथिर्क वर्षाकरीता र.रु. १,००,०००/- तरतुद करण्यात आली असुन सदर लेखाशिर्षातुन पाणीपुरवठा विभागाकडील शिकाऊ प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन अदा करणेत येते. सदर लेखाशिर्षामधुन माहे जुलै २०१५ अखेरपर्यंत र.रु. ९३९७१/- खर्ची पडली असुन र.रु. ६०२९/- इतकी रक्कम शिल्लक आहे. पाणीपुरवठा विभागाकडील शिकाऊ प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन अदा करणेकामी सदर तरतुद कमी पडत असलेने शिकाऊ प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन बिले अदा करणेकामी "स्थायी अस्थापना" या लेखाशिर्षामधुन "अस्थायी अस्थापना" या लेखाशिर्षावर र.रु. २,००,०००/- तरतुद वर्ग करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर झाला

------------------

ठराव क्र. २१ विषय क्र. २
दिनांक : १८ /०९/२०१५ विभाग : स्थापत्य विभाग
सुचक : मा. अरुण मदन टाक अनुमोदक : मा.निता विलास पाडाळे
संदर्भ : मा. नगरसदस्य श्री. अरुण मदन टाक यांचेकडील दिनांक १४/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी येथील मिलिंदनगर प्रभाग क्र. ४३ पुनर्वसन प्रकल्प टप्पा क्र. १ येथील २४ इमारती या ठिकाणी काळेवाडी पुलाकडून त्रिलोक्य स्मशानभूमीपासुन मिलिंदनगर पुनर्वसन टप्पा क्र. १

या  ठिकाणी तीन रस्ते एकत्र येणा-या चौकास “राजे सम्राट अशोक चौक” असे नामकरण करण्यात यावे तसेच सदर ठिकाणी  महापालिकेच्या वतीने “राजे सम्राट अशोक चौक“ म्हणुन नामफलक लावणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानिमुते मंजूर झाला.

-------------------

ठराव क्र. २२ विषय क्र. ३

दिनांक : १८ /०९/२०१५ विभाग : विद्युत विभाग

संदर्भ :  मा. क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. डक्षे/वि/१/कावि/९३६/२०१५ दिनांक १८/०९/२०१५

ड क्षेत्रिय कार्यालयाचे विद्युत विभागाचे “अस्थायी अस्थापना” या लेखाशिर्षावर सन २०१५-१६ या आथिर्क वर्षाकरीता र.रु. १,१०,०००/- इतकी तरतुद करण्यात आली असुन सदर लेखाशिर्षातुन माहे जुलै २०१५ अखेर १,०६,१०९/- इतका खर्च विद्युत विभागाकडील कोपा व वीजतंत्री प्रशिक्षणार्थी म्हणुन मानधनावर काम करणा-या कर्मचा-यांची मागील काही विद्यावेतनाची बीले अदा करणेकामी झाला असुन तसेच सदर बीले ही दर सहा महिन्यांनी वाढत असलेने शिल्लक तरतुद कमी पडत असलेने विद्युत विभागाकडील “स्थायी अस्थापना” या लेखाशिर्षावरील र.रु. २,००,०००/- “अस्थायी अस्थापना” या लेखाशिर्षावर वर्ग करणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

------------------------

ठराव क्र. २३ विषय क्र. ४

दिनांक : १८ /०९/२०१५ विभाग : विद्युत विभाग

संदर्भ : मा. क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. डक्षे/वि/१/कावि/२८५/२०१५ दिनांक ०२/०९/२०१५

ड क्षेत्रिय कार्यालयाचे विद्युत विभागाचे महसुली कामातील “किरकोळ  देखभाल दुरुस्ती“ या लेखाशिर्षाअंतर्गत अंदाजपत्रकातील “ड प्रभाग इमारतीच्या उद्वाहकाची देखभाल व दुरुस्ती” या कामासाठी सन २०१५-१६ साठी केलेली तरतुद कमी पडत असल्याने “ड प्रभाग वाकड उपविभागातील शाळा इमारतींमध्ये विद्युत विषयक देखभाल व दुरुस्ती करणे” या कामातुन र.रु. ५०,०००/- व “ड प्रभाग कार्यालयातील दूरध्वनी यंत्रणेची  वाषिर्क देखभाल दुरुस्ती करणे” या कामातुन र.रु. १,००,०००/- अशी  एकुण र.रु. १,५०,०००/- तरतुद “किरकोळ  देखभाल दुरुस्ती” याच  लेखाशिर्षांतर्गत “ड प्रभाग इमारतीच्या उद्वाहकाची देखभाल व दुरुस्ती “ या कामासाठी  वर्ग करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

------------------------

ठराव क्र. २४ विषय क्र. ५

दिनांक : १८ /०९/२०१५ विभाग : स्थापत्य विभाग

सुचक – मा. आरती सुरेश चोंधे अनुमोदक – मा. निता विलास पाडाळे

संदर्भ : मा. आरती चोंधे यांचेकडील दिनांक १८/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५४ विशालनगर पिंपळे निलख येथील स.नं. २० नंदनवन सोसायटीकडे जाणा-या रस्त्यास “कै. संकेत रामचंद्र इंगवले पथ” असे नामकरण करणे व स.नं. २८ बालवडकर , बैकर, गायकवाड व ससार यांच्या घराकडे जाणा-या रस्त्यास “जय मल्हार कॉलनी” असे नामकरण करणे बाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर प्रस्ताव सर्वानिमुते मंजुर करणेत आला.

------------------

ठराव क्र. २५ विषय क्र. ६
दिनांक : १८/०९/२०१५ विभाग : स्थापत्य विभाग
सुचक – मा.रामदास गेणभाऊ बोकड अनुमोदक – मा. शिवाजी पाडुळे
संदर्भ : मा. रामदास गेणभाऊ बोकड यांचेकडील दिनांक १८/९/२०१५ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५६ मध्ये सर्व्हे नं. ७९ मध्ये आरक्षण क्र. ३५५ या ठिकाणी चिल्ड्रेन पार्क विकसित होत असुन सदर उद्यानास "श्रीमती शेवंताबाई खंडूजी जगताप मुलांचे उद्यान" असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करणेत आला.

------------------

मा. सचिव, सभा शाखा यांनी प्रभाग स्तरावर क्षेत्र सभा घेणेबाबत मा. आयुक्त सो. यांचेकडून प्राप्त झालेल्या आदेशास अनुसरुन प्रत्येक प्रभाग कार्यक्षेत्रात क्षेत्र सभेचे आयोजन करणेबाबत जी कार्यवाही प्रस्तावित करणेची आहे त्याची माहिती सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांना दिली तसेच सर्व उपस्थित सन्मा. सदस्यांना मा. आयुक्त सो. यांचेकडील आदेशाची प्रत माहितीसाठी देणेत आली.

मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने सन्मा. सदस्यांनी खालीलप्रमाणे विविध विषयांवर त्यांचे मत व्यक्त केले.

**मा.रामदास बोकड** :- मा. अध्यक्ष मागील बैठकीमध्ये ज्या विषयांवर चर्चा झाली त्या विषयांवर मागील एक महिन्यात कार्यवाही करण्यात आली याची माहिती विभागप्रमुखांकडून घेणेबाबत ठरले होते. त्यानुसार मागील प्रभाग समितीमध्ये चर्चिलेल्या विषयांवर आढावा घेणेत यावा.

**मा. अध्यक्ष :-** मागील बैठकीमध्ये ज्या विषयांवर चर्चा झाली होती त्या विषयांवर मागील एक महिन्यात विभागप्रमुखांकडून जी कार्यवाही करण्यात आली त्याचा आढावा घेणेत यावा.

**पशूवैद्यकीय विभागाचे कामकाजाबाबत**

**मा. कैलासभाऊ थोपटे :** कुत्री पकडण्यासाठी पशू वैद्यकीय विभागाकडून जे नियोजन करण्यात आले आहे ते व्यवस्थित नाही.

**मा. नीता पाडाळे** : राजवाडेनगर कॉलनी क्र. ३ येथील तक्रार अद्याप निरस्त करण्यात आलेली नाही. स्वराज कॉलनी येथील डुकरांचा प्रादुर्भाव मोठया प्रमाणावर आहे.

**मा. सुनिता वाघेरे :-** पशू वैद्यकीय विभागाकडून कळविण्यात आल्यानुसार जी एजन्सी कार्यान्वित आहे त्यांचे प्रतिनिधी श्री.बापू पाटील यांना संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला परंतु सदर व्यक्तीने एकदाही संपर्क साधला नाही.

**मा. पशू वैद्यकीय अधिकारी** :- पशू वैद्यकीय विभागाकडे डुकरे पकडण्यासाठी कुशल कामगारांची आवश्यकता आहे. परंतु असे कर्मचारी आपल्याकडे उपलब्ध नाहीत. या कामासाठी रोजंदारी तत्वावर वा animal basis वर कामगार ठेवू शकतो.

**मा. रामदास बोकड** :- पशू वैद्यकीय विभागाचे कामकाजास अनुसरुन मा. महापालिका सभेपुढे प्रस्ताव मांडला होता. मा. आयुक्त सो. यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. क्षेत्रिय अधिकारी यांनी याबाबत कार्यवाही करणे अपेक्षित आहे. क्षेत्रिय अधिकारी यांनी कामगार उपलब्धतेबाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त सो. यांचेकडे सादर करावा.

**आरोग्य विभागाचे कामकाजाबाबत**

मा. सचिव, सभा शाखा :- दिनांक ७/८/२०१५ रोजी झालेल्या प्रभाग समिती बैठकीमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन मा. नीता पाडाळे यांनी आरोग्य विभागाकडील कचरा गाडयांचे नियोजन, औषध फवारणी, फॉगिंगचे कामे व्यवस्थित होत नसलेबाबत सांगितले होते.

**मा. नीता पाडाळे** : - औषध फवारणी, फॉगिंगचे कामे व्यवस्थित होत आहे परंतु कचरा गाडयांचे नियोजनामध्ये व्यवस्थितपणा नाही. कचरा गाडया दुरुस्तीकामी कार्यशाळेत असलेबाबत सांगण्यात येते.

**मा. सहा. आरोग्याधिकारी :-** कचरा गाडया कार्यशाळेकडुन वेळेत दुरुस्त होऊन मिळत नाहीत.

**मा.क्षेत्रिय अधिकारी : -** या कामी कार्यशाळा व्यवस्थापक यांचे समवेत चर्चा झाली असुन क्षेत्रिय कार्यालयांचे सोयीसाठी थेरगाव येथे कार्यशाळेची शाखा सुरु करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**मा. नीता पाडाळे** : - स्टॉर्म वॉटर चेंबर्सची साफसफाई या पूर्वी करण्यात आली असली तरी सद्यस्थितीत पावसाळयामुळे पुन्हा स्टॉर्म वॉटर चेंबर्समध्ये कचरा अडकलेला आहे. तरी सर्व स्टॉर्म वॉटर चेंबर्स साफ करुन घ्यावीत.

**मा. सहा. आरोग्याधिकारी :** कार्यवाही करण्यात येईल.

**मा. आरती चोंधे :-** कच-याच्या मोठया गाडया वेळेत येत नाहीत. एक दिवसा आड गाडी येते.

**मा. कैलासभाऊ थोपटे** :- ठेकेदारांकडील कच-याच्या गाडया असल्याने या गाडयांच्या दुरुस्तीचे कारण योग्य नाही. जर गाडी नादुरुस्त असेल तर त्यांचे बीलातुन पैसे कपात करणेची कार्यवाही करावी. तसेच फॉगिंगच्या गाडीचे नियोजन व्यवस्थित नाही त्यामुळे प्रत्येक प्रभागास फॉगिंगची गाडी मिळत नाही.

**मा. सहा. आरोग्याधिकारी :-** कचरा गाडयांचे नियोजनास अनुसरुन संपुर्ण प्रभाग क्षेत्राचा कार्यक्रम ठरविण्यात आला आहे त्याची प्रत सर्व सन्मा. सदस्यांना देणेत येणार आहे. फॉगिंगचे गाडीचे नियोजन केले असुन दोन वेळा एका प्रभागात गाडी पाठविल्यास रोटेशनने काही प्रभागात गाडी पाठविण्यास वेळ लागणार आहे ही वस्तुस्थिती आहे. या कामासाठी श्री. मद्रासी मलेरिया इन्सपेक्टर यांची नेमणुक केली आहे.

**मा. क्षेत्रिय अधिकारी** :- श्री. मद्रासी मलेरिया इन्सपेक्टर यांनी सर्व सन्मा. सदस्य यांचेशी संपर्कात राहुन फॉगिंगचे काम व्यवस्थितरित्या करावे अशा सक्त सूचना देणेत येत आहेत.

**मा. नीता पाडाळे** : - यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाचे मुख्य अधिकारी यांना ड प्रभाग समितीचे बैठकीस उपस्थित राहणेकामी कळविण्यात यावे.

**विद्युत विभागाचे कामकाजाबाबत** :-

**मा. सुनिता वाघेरे : -** डिलक्स चौक येथील पंपिंग स्टेशन येथे जनरेटर बसविण्याची कार्यवाही प्रलंबित आहे. तसेच ब-याच ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बॉक्सचे झाकण उघडे असते व विद्युत तारा बाहेर लोंबकळत असतात.

**मा. कार्यकारी अभियंता विद्युत** :- सदर कामकाज कार्यकारी अभियंता श्री. थोरात यांचेकडे आहे त्यामुळे ड क्षेत्रिय कार्यालयाकडून कार्यवाही करता येत नाही.

**मा. सुनिता वाघेरे** : - सदर बाबत मा. कार्यकारी अभियंता विद्युत श्री. थोरात यांना कळविण्यात यावे.

**मा. सचिव सभा शाखा** :- मागील बैठकीत पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व उप अभियंता हे बैठकीस उपस्थित नसल्याने सन्मा. सदस्यांनी नाराजी व्यक्त केली होती. मा. कार्यकारी अभियंता श्री. रामदास तांबे हे नागपूर येथे मा. आयुक्त यांचे सूचनेनुसार गेले आहेत. त्यांचेकडील उपअभियंता श्री. राजेंद्र जावळे व श्री. भाऊसाहेब साबळे उपस्थित आहेत.

**मा. आरती चोंधे :-** निसर्गपूजा, दुर्गापार्क,सिल्व्हर वुडस या सोसायटयांमधील पिण्याचे पाण्याचे नियोजन व्यवस्थित करण्यात यावे.

**मा. उपअभियंता श्री. साबळे** :- सदर कामासाठी जादा पाईपलाईन टाकण्याचे काम सुरु करण्यात येत आहे.

**मा. सभापती** : पाईपलाईनचे काम झाल्यानंतर किती दिवसात नळकनेक्शन देणेचे काम करण्यात येते.

**मा. कनिष्ठ अभियंता श्री. दाते :** - नळकनेक्शन साठी आवश्यक ती कागदपत्रे दिल्याशिवाय नळकनेक्शन देता येत नाही. झोपडपट्टी परिसरातील नागरीकांनी फोटोपासची प्रत दिल्याशिवाय नळकनेक्शन देता येत नाही.

**मा. कैलासभाऊ थोपटे** :- हॉटेल कुणाल ते रायगड कॉलनी येथे पाणी पुरवठा लाईन टाकण्यात आलेली नाही.

**मा. उपअभियंता, श्री. साबळे** :- . सदर ठिकाणी लाईन टाकण्यात आली आहे . लाईन टेस्टींगची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर कनेक्शन देणेची कार्यवाही करण्यात येईल.

**मा. रामदास बोकड :-** वैदूवस्ती येथे आरोग्य विभागाचे कार्यालयासाठी जागा देणेत आली आहे परंतु त्या ठिकाणी जे टॉयलेट आहे तेथे दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आली आहे परंतु पाण्याची सोय नाही. तेथे पाण्याचे कनेक्शन का देणेत येत नाही तसेच १००० लीटरची टाकी बांधणेची कार्यवाही का करणेत येत नाही याबाबत प्रशासनाकडून खुलासा करण्यात यावा.

**मा. उपअभियंता श्री. राजेंद्र जावळे** :- सदर पाण्याचे कनेक्शन दिले होते. काही कारणास्तव सदर कनेक्शन तुटले होते. ते दुरुस्त करण्यात आले आहे. परंतु पाण्याचे साठयासाठी १००० लीटरची टाकी बांधणेची कार्यवाही ही स्थापत्य विभागाकडून करण्यात येते.

**मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. ओंभासे** :- सदर ठिकाणी टाकी बांधण्याचे काम करणेत येईल.

**मा. राजेंद्र जगताप** :- सध्या पावसाचे प्रमाण कमी असल्याने व धरणातील उपयुक्त पाण्याचा साठा कमी असल्याने पुढील ७-८ महिन्यासाठी धरणातील पाणी साठा पुरेसा राहण्याच्या दृष्टीने जलतरण तलावांना टँकरद्वारे करण्यात येणारा पाणीपुरवठा बंद करण्यात यावा. तसेच मा. आयुक्त सो. यांनीही पाणी कपातीबाबत बैठक घेतली आहे. त्यानुसार साधारणपणे २० टक्के कपात पाणीकपात होईल. या स्थितीत संपूर्ण शहराला दिवसातुन एक वेळ दोन तास पाणीपुरवठा करणेत यावा. तसेच नळकनेक्शन देताना स्थापत्य व पाणीपुरवठा विभागाने एकत्रित रित्या समन्वय राखून कामकाज करावे.

**उद्यान विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली.**

**मा. रामदास बोकड** :- वृक्षारोपणाबाबत कार्यक्रमाचे नियोजन करुन प्रत्यक्ष कामाचे वेळी उद्यान/वृक्षारोपण विभागाकडून दिशाभूल करणेत आली . ही बाब योग्य नाही. पुढील बैठकीस उद्यान विभागाचे उपअभियंता यांना उपस्थित राहणेस सूचना देणेत याव्यात.

**मा. क्षेत्रिय अधिकारी** :- पुढील प्रभाग समिती बैठकीस उद्यान वृक्षसंवर्धन विभागाचे अधिका-यांना बैठकीस बोलविण्यात यावे.

**स्थापत्य विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली.**

मा.कैलासभाऊ थोपटे :- तापकीर माळ चौकापासुन रस्त्यांवरील खड्डयांची पाहणी करावी व रस्ते सुस्थितीत राहतील या दृष्टीने कार्यवाही करावी.

**मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. ओंभासे** :- सद्यस्थितीत खड्डे मुरुमाने भरण्यात आले आहेत. पावसाळयामुळे डांबराचे प्लँट बंद असलेने खड्डे भरणे शक्य नाही . जर खड्डे मोठे असतील तर पेव्हर ब्लॉकने खड्डे भरणेची कार्यवाही करणेत येईल.

**मा. आरती चोंधे** :- चेंबरची झाकणे नादुरुस्त झालेबाबत तक्रार असुन सारथी हेल्पलाईनवर तक्रार नोंदण्यात आलेली आहे.

**मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. ओंभासे** :- चेंबरची झाकणे दुरुस्तीबाबत आठ दिवसात कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

**मा. सभापती** :- जिजामाता हॉस्पिटल येथील रस्ता पाणी पुरवठा विभागाचे काम करताना खराब झाला आहे. सहा महिन्यापासुन सदर तक्रार प्रलंबित आहे.

**मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. ओंभासे** :- सदर ठिकाणी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

**मा. निता पाडाळे :-** काळेवाडी फाटा येथील टॉयलेटचे आऊटलेटचे काम अद्याप प्रलंबित आहे.

**मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. ओंभासे** :- सदर बाबत तातडीने कार्यवाही करण्यात येईल.

**मा. सागर कोकणे** : रहाटणी गावातील स्मशानभूमीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे तसेच शंकर मंदिराजवळील घाटाचे दुरुस्तीचे काम करुन घ्यावे.

**मा. कैलासभाऊ थोपटे :-** घाटाचे ठिकाणी लोकांना दशक्रिया विधीसाठी नदीकाठापर्यंत जाणेसाठी रस्ता आवश्यक आहे.

**मा. कार्यकारी अभियंता स्थापत्य श्री. ओंभासे** :- नदी पात्रात काम करणे शक्य नाही. जेवढी घाटाची जागा आहे तेथे काम करणे शक्य आहे.

**मा. राजेंद्र जगताप** :- १८ मीटर रस्त्यांच्या साईट पट्टयांमधील बांधकामांबाबत अद्याप कार्यवाही प्रलंबित आहे. अनधिकृत बांधकामांना नियमित कर तसेच शास्ती कर लावणेत येत आहे. म्हणुन बेकायदेशीर नळकनेक्शनचे प्रमाण वाढत आहे. नागरीक नियमित कर भरतात परंतु शास्ती कर भरत नसलेने त्यांना ना हरकत प्रमाणपत्र सादर देणेत येत नाही. सदर बाबत क्षेत्रीय अधिकारी यांनी चर्चा करावी.

**मा. क्षेत्रिय अधिकारी** :- या संदर्भात चर्चा झाली असून आपण मा. करसंकलन व कर आकारणी प्रमुख यांचेशी समक्ष चर्चा करावी.

**अतिक्रमण विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली .**

**मा. सचिव तथा प्रशासन अधिकारी सभा शाखा** :- ड क्षेत्रिय कार्यालयाचे अतिक्रमण विभागाकडे अतिक्रमण पथकामध्ये २ अतिक्रमण निरीक्षक, ८ मजुर कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

**मा. रामदास बोकड** : - नाशिक फाटा ते सुदर्शननगर येथे बीआरटी मार्गात स्ट्रीट लाईट बंद ठेवणेत आल्या आहेत. त्या चालू कराव्यात.

**मा. कार्यकारी अभियंता विद्युत श्री. चव्हाण :-** सदर स्ट्रीट लाईट चालू करणेत येतील.

**क्रीडा विभागाचे कामकाजाबाबत चर्चा झाली.**

**मा. राजेंद्र जगताप** : - पिंपळे गुरव येथील बॅडमिंटन हॉलचा भाडे करार संपलेला असुन सदर हॉल दुस-या संस्थेस भाडे कराराने देणेबाबत अद्याप कार्यवाही प्रलंबित आहे. त्याबाबत काय कार्यवाही करणेत आली याची माहिती द्यावी. तसेच एलबीटी बंद झाल्याने महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे आवश्यक आहे. तरी महापालिकेच्या ज्या इमारती, व्यापारी संकुले, बॅडमिंटन हॉल,जिम्नॅशियम हॉल, सभागृह भाडेकराराने देणेत येतात त्यांचेबाबतची सविस्तर माहिती घेणे आवश्यक आहे. भुमि आणि जिंदगी विभागाकडून महापालिका इमारतींबाबत आवश्यक ती खबरदारी देणे आवश्यक आहे. पिंपळे गुरव येथील अंध शाळेच्या वरच्या मजल्यावर वाचनालय घेणेत यावे इ. विषयांवर क्रीडा विभागाकडून आवश्यक ती माहिती देणेत यावी.

**मा.क्रीडा पर्यवेक्षक श्री. गेंगजे** :- याबाबत क्रीडा विभागाकडून माहिती घेतली असता अद्याप निविदा प्रक्रिया सुरु झालेली नाही. मा. आयुक्त सो. यांचे मान्यतेने पुढील निविदा विषयक कार्यवाही करण्यात येणार आहे.

**मा. रामदास बोकड** :- महापालिकेच्या ७५ व्यायामशाळांचे साहित्याचे टेंडर अद्याप अंतिम झालेले नाही. त्यातील ३६ व्यायाशाळांना सेवाशुल्क आहे. सदर व्यायामशाळांचे व्यवस्थापन योग्य पध्दतीने

होत नाही. तसेच बॅडमिंटन हॉल,जिम्नॅशियम हॉल इ. बाबतचे व्यवस्थापन नीट होत नसलेचे निदर्शनास येते.

**मा. क्षेत्रीय अधिकारी :-** बैठक समाप्तीचे पूर्वी सर्व शाखाप्रमुखांना सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या सूचनांस अनुसरुन आवश्यक ती कार्यवाही करुन संबंधितास त्याबाबत माहिती देणेकामी सूचना देणेत येत आहेत.

**मा. सभापती:-** सर्व उपस्थित सन्मा. सदस्य यांनी ज्या बाबींवर मत प्रदशिर्त केले आहे त्या सर्व बाबींवर संबंधित अधिकारी यांनी आवश्यक ती कार्यवाही करुन सन्मा. सदस्य यांना सदर माहिती द्यावी असे सूचना देऊन बैठक संपलेचे जाहीर करतो.

सही/-

( अरुण मदन टाक )

**सभापती**

ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,

रहाटणी ४११०१७

सही/-

**प्रशासन अधिकारी तथा**

सचिव (सभाशाखा)

ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/९५/२०१५

दिनांक – २४ /०९ /२०१५